महा मेट्रो

PUNE METRO

***महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड***

***(पुणे मेट्रो रेल प्रकल्प)***

***महा मेट्रो : आर.बी. मिल रोडवर पहिल्या पाईलचे कार्य पूर्ण***

***सिव्हील कोर्ट ते रामवाडी(रिच–३) येथे मेट्रो निर्माण कार्यास सुरवात***

पुणे १५ : महा मेट्रोचे कार्य संगम ब्रिज ते बंडगार्डन या विभागात सुरु असून येथे पहिल्या पाईल चे काम नुकतेच पूर्ण करण्यात आले आहे. मेट्रो पिअर्स चा पाया भक्कम करण्यासाठी पाईल प्रकारचे फाउंडेशन करणे गरजेचे असते. यामुळे लवकरच आपणास मंगळवार पेठ ते पुणे मेट्रो स्टेशन या प्रस्तावित मेट्रो स्टेशन दरम्यान पहिला पिअर या मार्गावर उभा झालेला दिसेल. या रिच मध्ये युटीलीटी शिफ्टिंगची कार्ये सुरु असून बैरीकेडस लावण्याचे कार्य प्रगतीपथावर आहे. या मार्गावर मोठ्या प्रमाणात संस्था आहेत, जसे; सेंन्ट्रल रेल्वे डीआरएम ऑफीस,हॉटेल्स, इंजिनियरिंग कॉलेज,हॉस्पिटल तसेच बाजारपेठ या भागात मोठ्या प्रमाणात ये- जा करण्याकरिता नागरिकांची सतत राहदारी सुरु असते या ठिकाणी मेट्रो वाहतूक सुरु झाल्यास निश्चितच मोठ्या प्रमाणत नागरिकांना याचा फायदा होणार हे देखील तितकेच खरे. शहराला उत्तर पुणे ते दक्षिण पुणेला जोडणारा प्रमुख मार्गा पैकी एक आहे.

या रिच चे कार्य मेसर्स. जे.कुमार इन्फ्रा प्रोजेक्टस लिमिटेड या कंपनीला देण्यात आले आहे. प्राथमिक टप्प्यात रिच – ३ चे कार्य आरटीओ कार्यालय ते बंड गार्डन भागात करण्यात येणार असून या ठिकाणी १३३ पिलरचे निर्माण कार्य केल्या जाईल. ३.५ कि.मी. च्या या मेट्रो मार्गावर मंगळवार पेठ,पुणे स्टेशन,रुबी हॉल आणि बंड गार्डन मेट्रो स्थानकांचा समावेश आहे. ही संपूर्ण स्टेशन एलीव्हेटेड राहणार असून पुणे रेल्वे स्टेशन या ठिकाणी मेट्रो प्रवाशांना सरळ रेल्वे पादचारी पुलावर जाता येईल. वाघोली परिसरात १० एकर जागेत या रिच चे कास्टिंग यार्ड निर्माण करण्यात येत असून लवकरच या ठिकाणी गर्डर सेग्मेंट कास्टिंगचे कार्य सुरु करण्यात येईल.